चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
२८ ऑक्टोंबर, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7447744100 (PRO)

# प्रेम प्रकरणातुन झालेल्या खुनातील आरोपींना चंद्रपुर शहर पोलीसांनी केले जेरबंद

दिनांक २६/१०/२०१९ रोजी फियादी महिला हिने दिलेल्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अप.क्र. ९०३/२०१९ कलम ३०२, ३४ भादंवि चा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर घटनेतील मृतक नामे अक्षम मुन याचे प्रेमसंबंध होते. यातील आरोपी साजन उर्फ बोदया हा अक्षयच्या प्रेयसीला तु माझा सोबत बोल असे बोलुन त्रास देत होता. यावरून एके दिवशी ही बाब अक्षय यास लक्ष्यात आल्याने अक्षय याने साजन यास विचारले की, तु माझा प्रेयसीला का त्रास देतो, या कारणावरून त्यांचेत बाचाबाची झाली. या कारणावरून आरोपी यांने मनात राग धरून आपल्या मित्रांसह अक्षय याचा घुटकाळा चौक परिसरात धारदार चाकुने वार करून त्याचा खुन केला. आणि घटनास्थळावरून पसार झाले. पोलीसांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत तात्काळ आरोपीचा शोध घेण्यास सुरवात केली आणि काही वेळातच यातील **आरोपी नामे १) साजन उर्फ बोदया रंजीत डोंगरे वय १९** यास अटक केली, आणि आज दिनांक २८/१०/२०१९ रोजी यातील दुसरा **आरोपी नामे २) राजन उर्फ गुलशन डोंगरे वय २१** यास अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढिल तपास आणि आरोपीचा शोध पोलीस अधीक्षक श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात चंद्रपुर शहर पोलीस करीत आहे.

---